# जाहिरात

## नागपूर शहर पोलीस शिपाई भरती सन – 2009

क.पोआना/2द/सआलि–5/पो.भ.09/2010 नागपूर, दिनांक 03/02/2010

पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर या पोलीस घटकात दिनांक 08/03/2010 रोजी पोलीस भरती आयोजित करण्यात आलेली आहे. पोलीस भरती करीता आवश्यक असलेल्या आवेदन अर्जाचा नमुना www.nagpurpolice.org या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. सदर संकेत स्थळावरून डाउनलोड केलेला विहीत नमुन्यातील आवेदन अर्ज भरून आवश्यक ते प्रमाणपत्र/कागदपत्र आणि " P.A. TO COMMISSIONER OF POLICE, NAGPUR CITY " या नावाने तयार केलेल्या रूपये 50/– ची इंडीयन पोस्टल ऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्टसह व्यक्तिशः पोलीस मुख्यालय, पोलीस लाईन टाकळी, नागपूर या ठिकाणी दिनांक 08/03/2010 रोजी दुपारी 12.00 वाजेपर्यंत भरती प्रकियेसाठी उपस्थित रहावे. त्यावेळेनंतर आलेल्या उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही.

पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर या पोलीस घटकात ज्या उमेदवारांचे पोलीस भरती साठी आवेदन अर्ज दिनांक 10/08/2009 रोजी स्विकारण्यात आलेले आहेत, त्यांनी पुन्हा दिनांक 08/03/2010 रोजी नविन आवेदन अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही. तथापी त्यांनी दिनांक 09/03/2010 रोजी सकाळी 07.00 वाजता नंतर पुढील पोलीस भरती प्रकीयेसंबंधी माहीती घेण्याकरीता पोलीस मुख्यालय, पोलीस लाईन टाकळी, नागपूर या ठिकाणी उपस्थित रहावे.

पोलीस आयुक्तालय, नागपूर पोलीस घटकात खाली दर्शविल्याप्रमाणे पोलीसांची रिक्त पदे भरण्यासाठी पोलीस भरती आयोजित करण्यात आलेली आहे.

1) पोलीस शिपाई :

| पद | अजा | अज | विमाप्र | विजा–अ | भज–ब | भज–क | भजड | इमाव | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पोलीस शिपाई | 43 | 23 | 07 | 10 | 08 | 12 | 07 | 63 | 159 | 332 |

2) 4 पदे बॅन्डस्मनची भरली जातील.

| पद | अजा. | अज. | विमाप्र | विजा–अ | भज–ब | भज–क | भज–ड | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पोलीस शिपाई | – | 01 | – | 01 | – | 01 | – | 01 | – | 04 |

- खेळाडू, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, गृहरक्षक दल, महिला यांचेकरिता असलेले आरक्षण हे समांतर आरक्षण असून ते सामाजिक आरक्षणांतर्गत समाविष्ट आहे. (संदर्भ : शासन परिपत्रक कमांक एसआरव्ही–1097/प्र.क.31/98/16–अ, दि. 16/3/1999)

–2–

**टिप** :– वर दर्शविलेली पदसंख्या व आरक्षणात बदल होण्याची शक्यता असू शकते, त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार हे सक्षम प्राधिका–यास राहतील. **सदरची पदे मागील अनुशेष विचारात घेवून दर्शविण्यात आलेली आहेत.**

**वेतनश्रेणी** : शासन वित्तविभाग अधिसुचना क्र.वेपुर 1209/प्र.क्र.27/सेवा–9, दि.22/4/09 अन्वये पोलीस शिपाई पदाकरिता मंजूर करण्यात आलेल्या वेतनश्रेणीनुसार अनुज्ञेय वेतन व भत्ते. शासन निर्णय अं.नि.ओ. 10055/126/सेवा–4, दि.31/10/2005 अन्वये नियुक्तीस पात्र ठरणा–या पोलीस शिपायांस " परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना " लागू ठरेल.

**वयोमर्यादा** : दिनांक **28/02/2010** रोजी वय 18 वर्षे पूर्ण आणि 25 वर्षापेक्षा अधिक नसावे, मागासवर्गीयांना 05 वर्षे शिथिलक्षम.

**शैक्षणिक अर्हता** : महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, 1965 (सन 1965 चा महाराष्ट्र अधिनियम 41) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता 12 वी) किंवा शासनाने या परीक्षेस समकक्ष (राष्ट्रीय मुक्त विद्यालय, नवी दिल्ली यांची सिनीयर सेकेंडरी स्कूल परिक्षा तसेच सीबीएसई बारावी परीक्षा या दोन्ही परिक्षा हया राज्य मंडळातर्फे घेण्यात येणा–या 12 इयत्तेच्या परीक्षेशी समकक्ष आहेत ) घोषित केलेली परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**शारिरिक पात्रता : महिला** : किमान उंची : 155 सें.मी.
**पुरूष** : किमान उंची : 165 सें.मी.
**छाती** : न फुगवता 79 सें.मी. (न फुगविलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक 05 सें.मी. पेक्षा कमी नसावा.)

**चाचणी** : शारिरिक पात्रता पूर्ण करणा–या उमेदवारांची 100 गुणांची शारीरिक चाचणी, 75 गुणांची लेखी चाचणी आणि 25 गुणांची मुलाखत चाचणी घेण्यात येईल. शारीरिक, लेखी व मौखिक चाचण्या अनिवार्य आहेत.

**शारिरिक चाचणी खालील प्रमाणे राहील** :

**पुरूष** : (1) 100 मिटर्स धावणे, (2) 800 मिटर्स धावणे, (3) पुल अप्स (10),
(4) लांब उडी (5) गोळा फेक (7.260 कि.ग्रा.)

**महिला** : (1) 200 मिटर्स धावणे, (2) 03 किमी चालणे, (3) लांब उडी (4)गोळा फेक (4 कि.ग्रा.)

**लेखी चाचणी पुढील प्रमाणे राहील** : (1) अंकगणित (2) सामान्यज्ञान व चालु घडामोडी (3) मराठी भाषेत निबंध लेखन.

**बॅन्डस्मन** :– बॅन्ड पथकातील पदासाठी अर्ज करणा–या उमेदवारांना बॅन्ड पथकातील वाद्यांची माहिती असणे व वाद्य वाजविण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. बॅन्डस्मन पदासाठी 10 वी उत्तीर्ण उमेदवार अर्ज करू शकतील.

तसेच सदर उमेंदवारांना उंची मध्ये 2.5 सें.मी. व छातीमध्ये 2 सें.मी. न फुगवता/1.5 सें. मी. फुगवून इतकी सुट देय राहील. सदर सवलत देण्याचे अधिकार पोलीस महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील.

–3–

**महिलांसाठी आरक्षण**: उपरोक्त नमुद घटकातील पदांमध्ये शासन नियमाप्रमाणे महिलांसाठी 30 % इतके समांतर आरक्षण असुन एखाद्या संवर्गात त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर रिक्त पदे पात्र पुरूष उमेदवारांमधून भरण्यात येतील.

**महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क. 82/2001/मसेआ–2000/प्र.क. 415/का–2, दि. 25/5/2001 निर्गमित केलेल्या निर्णयानुसार महिलांसाठी राखीव असलेल्या 30 % समांतर आरक्षणाकरिता (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती वगळून) नॉन क्रिमीलेअर प्रमाण पत्र भरतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.**

**गृहरक्षक दल (होमगार्ड) आरक्षण** : एकूण पदांच्या 05 % इतके समांतर आरक्षण पदे गृहरक्षक दलातून भरण्यात येतील. उमेदवाराची भरतीच्या दिनांका पूर्वी (08/03/2010) गृहरक्षकदलामध्ये कमीत कमी 3 वर्ष सेवा पूर्ण झालेली असणे आवश्यक आहे.

**माजी सैनिक आरक्षण** : एकूण पदांच्या 15 % इतके समांतर आरक्षण पदे ही माजी सैनिकातून भरण्यात येतील. तसेच त्यांच्या वयामध्ये त्यांची सैन्यदलात जितकी सलग सेवा (सहा महिन्यांपेक्षा कमी नाही) झाली असेल तेवढी वर्षे अधिक 03 वर्षे इतकी सवलत देय राहील.

**प्रकल्पग्रस्त आणि भूकंपग्रस्त आरक्षण : सामान्य** प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. भुकंप–1009/प्र.क्र.207/2009/16 अ, दि. 27/8/2009 अन्वये प्रकल्पग्रस्तांना असलेले 5% समांतर आरक्षण त्यांच्यासाठीच राखुन ठेवून या आरक्षणाअंतर्गत भुकंपग्रस्तांसाठी ठेवलेले आरक्षण काढून भुकंपग्रस्तांसाठी स्वतंत्रपणे 2% समांतर आरक्षण लागु राहील. शासनाने वेळोवेळी दिलेल्या सवलती सदर उमेदवारांना पोलीस भरतीच्या वेळी देय राहतील.

**खेळाडू उमेदवार** : खेळाडू उमेदवारांनी त्यांचे खेळा विषयीचे प्रमाणपत्र संचालक, क्रिडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून तपासणी केलेले असणे आवश्यक राहील, एकूण पदांच्या घटक निहाय 05 % पदे खेळाडू उमेदवारातून भरण्यात येतील.
खेळाडूंबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या सवलती व निर्देशानूसार भरण्यात येतील. सदरची सूट फक्त पुढे नमूद किडा कामगिरी करणा–या खेळाडूसाठीच देय राहील. (1) राज्यस्तर (आंतर जिल्हा) पदक विजेता (2) अखिल भारतीय आंतर् विद्यापीठ स्तर प्रतिनिधीत्व (3) राष्ट्रीय स्तर प्रतिनिधीत्व (4) आंतरराष्ट्रीय स्तर प्रतिनिधीत्व.

**खेळाची नावे :**

| | | |
|---|---|---|
| 1) आर्चरी (धनुर्विद्या) | 2) ॲथलेटिक्स व कॉस कन्ट्री | 3) ॲक्वेटिक्स (पाण्यातील खेळ) |
| 4) बॅडमिंटन | 5) बॉक्सिंग | 6) बास्केटबॉल |
| 7) जिम्नॅस्टिक्स | 8) हॅण्डबॉल | 9) खो–खो |
| 10) ज्युडो | 11) कबड्डी | 12) रोवींग |
| 13) लॉन टेनिस | 14) शूटिंग | 15) वेटलिफ्टींग |
| 16) टेबल टेनिस | 17) व्हॉलीबॉल | 18) तायक्वांदो |
| 19) कुस्ती | 20) हॉकी | 21) बिलीयर्डस् व स्नूकर |
| 22) फूटबॉल | 23) कराटे | 24) पॉवर लिफ्टिंग |
| 25) बॉडी बिल्डिंग | 26) किकेट | 27) कॅनोईंग–कयाकिंग(होडी वल्हविणे) |
| 28) रग्बी | | |

तसेच पुरूष व महिला खेळाडूंना किमान उंचीच्या अटिमध्ये 2.5 से. मी. इतकी सूट देय राहील.

–4–

## अर्जदारासाठी आवश्यक सूचना :

1) " आवेदन अर्ज " **www.nagpurpolice.org** या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.
2) रू. 50/– ची इंडीयन पोस्टल ऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्ट **P.A. TO COMMISSIONER OF POLICE, NAGPUR CITY** या नावांने तयार केलेला अर्जासोबत जोडावा.

3) छाननीच्या वेळी मूळ प्रमाण पत्रे दाखवणे बंधनकारक आहे.

4) **अर्जदाराने अर्जासोबत दिनांक 08/03/2010 पूर्वी सक्षम अधिका–याने निर्गमीत केलेल्या प्रमाणपत्राच्या सुस्पष्ट दिसतील अशा सक्षम प्राधिका–याने साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.**
    1) शाळा सोडल्याचा दाखला.
    2) शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र, गुणपत्रक.
    3) **सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.बीसीसी–2009/प्र.क्र. 291/09/16 ब, दि.05/11/2009 नुसार मागासवर्ग उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अर्जदारांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय त्यांना नियुक्ती देण्यात येणार नाही.**
    4) प्रकल्पग्रस्त असल्यास त्याबाबत जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्याकडील प्रमाणपत्र.
    5) अधिवास (डोमेसाईल) प्रमाणपत्र.
    6) सामाजिक न्याय विभागाने निश्चित केलेले निकष व अटीनुसार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन–क्रिमीलियर) निकटतम वर्षाचे कालावधीचे प्रमाणपत्र.
    7) विविध आरक्षण प्रवर्गात मोडणा–या उमेदवारांनी संबंधित प्रवर्गाचे प्रमाणपत्र.

प्रमाणपत्राच्या छाननीच्या वेळी उमेदवारांनी उपरोक्त मुळ **(Original)** प्रमाण पत्रे दाखवणे बंधनकारक आहे. मुळ प्रमाण पत्रे उपलब्ध नसल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

1) सर्व अटींची व आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करणारे उमेदवार सदर पदासाठी अर्ज करणेस पात्र राहतील.
2) सदर पोलीस भरतीची विस्तृत माहीती **www.maharashtra.gov.in / www. mahapolice.gov.in** या संकेत स्थळावर तसेच पोलीस मुख्यालयातील नोटीस बोर्डावर उपलब्ध राहील.
3) पोलीस भरतीतील प्रत्येक प्रकियेबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.
4) पोलीस भरती प्रकियेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शारिरीक इजा/नुकसान झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.
5) भरती प्रकियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशीलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास उमेंदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

( पी.टी. पाटील )
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त, नागपूर
यांचे करीता.

P.B.09-Add.